# वसई-विरार शहर महानगरपालिका

## लेखा विभाग मुख्यालय

दि.23/3/2022

# प्रेस नोट

**<u>सुधारित अर्थसंकल्प सन 2021-22 सह मुळ अर्थसंकल्प सन 2022-23 अंदाजपत्रकाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 96 ते 100 ला अनुसरुन</u>**

**<u>अर्थसंकल्प मंजुरीबाबत</u>**

वसई विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 95 अन्वये सन 2021-22 या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अंदाज व सन 2022-23 या वर्षाचे मुळ अंदाज तयार केले असून कलम 96 ते कलम 100 नुसार सदर अर्थसंकल्पीय अंदाज आयुक्तांचे वतीने श्री. अरुण कोल्हे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दि. 16/3/2022 रोजी मा. प्रशासक श्री. अनिलकुमार पवार यांना सादर केले होते. सदर अंदाज व मागण्यांवर दि. 16/3/2022 ते दि. 23/3/2022 या कालावधीत सर्व विभाग व मा. लोकप्रतिनीधी यांचेशी सविस्तर चर्चा व विचारविनिमय करुन अर्थसंकल्पीय अंदाज अंतिम स्विकृतीसाठी मा. प्रशासक यांना सादर करण्यात आले. त्यानुसार मा. प्रशासक मा. अनिलकुमार पवार यांनी दि. 23/3/2022 रोजी काही फेर बदलासह सदर अंदाजपत्राकास अतिम मंजुरी दिली आहे ते खालील प्रमाणे.

**मा. प्रशासक यांनी स्विकृत केलेल्या रकमांचा अर्थसंकल्पीय गोषवारा**

(रु. लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन 2021-22 मुळ अंदाज | सुधारित अंदाजपत्रक 2021-22 | अर्थसंकल्प 2022-23 मा. प्रशासक |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारंभिक शिल्लक | 56302.05 | 86116.82 | 71595.33 |
| 2 | महसुली जमा | 106416.40 | 110900.31 | 123385.00 |
| 3 | भांडवली जमा | 19949.84 | 11138.81 | 17229.58 |
| 4 | असाधारण व ऋण निलंबन जमा | 17359.92 | 20163.23 | 23257.12 |
| 5 | एकत्रित जमा रकमा | 143726.16 | 142202.35 | 163871.70 |
| 6 | प्रारंभिक शिल्लकेसह एकत्रित जमा रक्कम | 200028.21 | 228319.16 | 235467.03 |
| 7 | महसुली खर्च | 88383.90 | 83382.00 | 108468.77 |
| 8 | भांडवली खर्च | 91064.56 | 54469.62 | 105412.68 |
| 9 | असाधारण व ऋण निलंबन खर्च | 16848.28 | 18872.22 | 21442.83 |
| 10 | एकत्रित खर्च रकमा | 196296.74 | 156723.84 | 235324.28 |
| 11 | अखेर शिल्लक रकमा | 3731.47 | 71595.33 | 142.75 |
| 12 | अखेरच्या शिल्लकेसह एकत्रित खर्च रक्कम | 200028.21 | 228319.16 | 235467.03 |

**अर्थसंकल्पीय तरतुदीतील ठळक फेरबदल**

- मालमत्ता कर सन 2022-23 रु. 201 कोटी 45 हजार तरतुदी ऐवजी रु. 211 कोटी 45 हजार करण्यात आली आहे.

- विकास विषयक कामांसाठी राखीव निधी (निरी/आय.आय.टी या तांत्रिक तज्ञ संस्थे मार्फत पुर प्रतिबंधक कामे होल्डींग पॉन्डस व इतर कामे) सन 2022-23 रु. 10 कोटी तरतुदी ऐवजी रु. 20 कोटी करण्यात आली आहे.
- दिव्यांग विशेष व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना व योजना राबवणाऱ्या संस्थांसाठी योजनांतर्गत वित्तीय सहाय्य सन 2021-22 रु. 4.5 कोटी तरतुदी ऐवजी रु. 6 कोटी करण्यात आली आहे.
- नाले सफाई/ खोदाई सन 2022-23 रु. 5 कोटी तरतुदी ऐवजी रु. 10 कोटी करण्यात आली आहे.
- अमृत व इतर योजना प्रकल्प अधिकारी व तांत्रिक सल्लागार मानधन व इतर खर्च सन 2022-23 रु. 4 कोटी तरतुदी ऐवजी रु. 8 कोटी करण्यात आली आहे.
- सुर्या योजना पाण्याचे देयक सन 2021-22 रु. 5 कोटी 29 लक्ष 3 हजार तरतुदी ऐवजी रु. 6.75 कोटी करण्यात आली आहे.
- सहाय्यक अधिमुल्य (Ancillary Premium) सन 2021-22 रु. 30 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1 कोटी तसेच सन 2022-23 रु. 50 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 2 कोटी करण्यात आली आहे.
- न.र.वि. सहाय्यक अधिमुल्य (Ancillary Premium) खर्च सन 2021-22 रु. 15 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 50 लक्ष तसेच सन 2022-23 रु. 25 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1 कोटी करण्यात आली आहे.
- सन 2022-23 या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदी मध्ये रु. 22.63 कोटी इतकी वाढ झाली असून सदरची वाढ अखेरची शिल्लक रु. 16.57 कोटी ऐवजी 1.42 कोटी इतकी करून भरून काढण्यात आली आहे.

**सन 2022-23 मध्ये शहरातील करदात्यांना खालील प्रमाणे.**

**सवलती पुढे चालू ठेवण्यात आल्या आहेत.**

- आगामी वर्षात देखील 5 वर्षाचा मालमत्ता कर आगाऊ भरणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात 15% दराने प्रोत्साहनपर सवलत देण्याची तरतुद आहे. परंतू सदर मागणी बीलाचा भरणा हा त्यांनी बिल मिळाल्यापासून 15 दिवसांत करणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात मालमत्ता करात किंवा इतर करांमध्ये वाढ झाल्यास त्या कराच्या रकमेच्या फरकाचा भरणा मालमत्ता धारकास करावा लागेल.
- स्वातंत्र्य सैनिक व आजी माजी सैनिक त्यांच्या पश्चात त्यांची विधवा पत्नी हयात असेपर्यत त्यांच्या राहत्या स्वमालकीच्या अधिकृत निवासी सदनिकेस वेळोवेळीच्या मागणी नुसार मालमत्ता करात 100 % सुट आहे.
- नव्याने विकसित केल्या जाणा-या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असून यामुळे नविन इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था झाली आहे. त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत झाली आहे व होत आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामध्ये सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ट असल्याने मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष इतका खर्च अनुदान अदा करणेची तरतूद यावर्षी देखील पुढे चालू ठेवण्यात आली आहे.
- निसर्ग ऋण प्रकल्प राबविण्यासाठी एकत्रित मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष इतका खर्च अनुदान अदा करणेची तरतूद यावर्षी देखील पुढे चालू ठेवण्यात आली आहे.

सन 2021-22 च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन 2022-23 चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक "अ", महानगरपालिकेच्या "अ" अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, दिव्यांग कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, "ब" अंदाजपत्रक परिवहन सेवेकरीता, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक "क", वृक्ष निधी अंदाजपत्रक, एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह विनीयोग कर्ज निधी अंदाजपत्रक, सॅटेलाईट सिटी / अमृत योजना इत्यादी विशेष निधीचे अदांजपत्रक, इतर आवश्यक सहपत्रासह सन 2021-22 चा सुधारीत रु. 2283.19 कोटी व सन 2022-23 चा मुळ रु. 2354.67 कोटीचा व रु. 1.42 कोटी शिलकीचा अर्थसंकल्प मंजुर करण्यांत आला आहे.

मा. प्रशासक महोदयांनी मंजूर केलेला प्रशासकीय ठराव सोबत जोडला आहे.

**मुख्यालय लेखा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**